**<u>वादीतर्फे सा.क्र. ३ चा उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री. डी. के. भालके यांच्यामार्फत शपथेवर सुरू:–</u>**

२. वादी उषा माझ्या भावकितील आहे व दुरून नात्याने पुतणी लागते. हे म्हणणे खरे आहे की, मला भुकंपात घर मिळाले होते. मला सांगता येणार नाही की, माझे नाव जिल्हाधिकारी यांच्याकडील यादीमध्ये आले होते किंवा नाही. वादी उषा हिचे मुळ गाव होळी आहे. उषा हिने उत्तम रामा राठोड यांच्याकडून घर विकत घेतले आहे. हे मला माहित नाही की, सदर घर २०१० साली घेतले किंवा कसे.

प्रश्न:– उषा देवताळा येथे आल्यावर तिने घर घेतले का ?

उत्तर:– ती पहिल्यापासूनच येथे आहे.

३. हे म्हणणे खरे नाही की, सदर घरामध्ये उषा हिने अतिक्रमण केले व तेंव्हापासून वाद सुरू झाला. हे मला माहित नाही की, २०१४ साली उषा सदर घरामध्ये राहयला गेली व भांडण सुरू झाले. हे म्हणणे खरे नाही की, उषा ही सध्या उत्तम रामा राठोड यांच्याकडून विकत घेतलेल्या घरामध्ये राहते.

४. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शपथपत्रामध्ये खोटे सांगितले आहे की, उषा ही सन १९९६ पासून सदर घर क्र. २७३ मध्ये राहते. हे म्हणणे खरे नाही की, सदर घर क्र. २७३ मध्ये वादी उषा हिने केवळ सामान ठेऊन त्यास लॉक केले आहे. सदर घरापासून माझे घर थोडे दुर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे खोटे सरतपासणीचे शपथपत्र उषाला मदत करण्यासाठी दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**साक्षीदार क्र. ३ चा उलटतपास प्रतिवादी क्र. २ ते ४ यांच्यामार्फेत:–**

प्रतिवादी क्र. २ ते ४ व त्यांचे विधीज्ञ यांना वारंवार पुकारा केला असता गैरहजर. सबब, उलटतपास नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

Digitally signed by SUJIT BABRUWAHAN PATIL
Date: 2026.07.18 16:39:58 +0530

(सुजित ब. पाटील)

दिनांकः–१८.०७.२०२६ दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.